Dr.S.K.Sarje

# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98

UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

## "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019

Volume-II, February 2019 (Special Issue)

✣ EDITOR IN CHIEF ✣

DR. M. RAGHIB DESHMUKH

✣ GUEST EDITOR ✣

DR. BALASAHEB JADHAV

www.scholarsimpact.com

: Organised by :

Department of Political Science
M.S.P. Mandal's
SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.
UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

# CONTENTS



| Sr. No. | Research Papers | Page No. |
|---|---|---|
| 1. | "दहशतवाद" भारतीय लोकशाहीला धोका<br>डॉ. एन. झेड. पाटील | 1- 3 |
| 2. | जात प्रभुत्व व महाराष्ट्रातील सत्ताकारण<br>डॉ. पंजाब चव्हाण, प्रा. ए. बी. जाधव | 4 – 6 |
| 3. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>डॉ. बी. के. शिंदे | 7 – 11 |
| 4. | भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमे<br>डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे | 12 – 17 |
| 5. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. कविता गंगाधरराव सोनकांबळे | 18 – 22 |
| 6. | भारतीय लोकशाही आणि विरोधी पक्षाची भुमिका<br>प्रा. डॉ. सुरेश भालेराव | 23 – 25 |
| 7. | आघाडयांच्या राजकारणाचा भारतीय संघव्यवस्थेवर होणारा प्रभाव<br>Dr. S. B. Phad | 26 – 31 |
| 8. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षीत लोकशाही व लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक तत्वे : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. शामसुंदर वाघमारे | 32 – 36 |
| 9. | भारतीय संविधानातील मूल्यविचार<br>डॉ. कल्याण गोलेकर | 37 – 39 |
| 10. | भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. खान इकबाल गफ्फार | 40 – 41 |

| | | |
|---|---|---|
| 21. | भारतीय लोकशाहीमध्ये नीती आयोगाची भूमिका<br>प्रा. डॉ. गुडे दुर्गादेवी तुकाराम | 75 – 77 |
| 22. | भारतीय लोकशाही आणि प्रांतवाद<br>घन आनंद लक्ष्मीकांत | 78 – 81 |
| 23. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. डि. आर. भागवत, प्रा. डॉ. शकुंतला देवराव जवंजाळ | 82 – 85 |
| 24. | भ्रष्टाचार ही लोकशाही पुढील आव्हान ! एक अध्ययन<br>प्रा. डॉ. डी. के. कदम | 86 – 88 |
| 25. | अन्यथा भारताची लोकशाही संकटात सापडेल<br>प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 89 – 91 |
| 26. | भारतीय लोकशाही आणि सुशासन<br>प्रा. धर्मराज केशवराव कटके | 92 – 94 |
| 27. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मतदानाच्या हक्काबाबत विचार<br>प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | 95 – 98 |
| 28. | लोकशाहीवर दहशतवादाचा होणारा परिणाम<br>प्रा. शेंडगे वैभव | 99 – 101 |
| 29. | भारतीय लोकशाहीचे वास्तव व स्वरूप<br>प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने | 102-104 |
| 30. | दहशतवाद भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान<br>प्रा. के. एम. नागरगोजे | 105-106 |

(26)

# भारतीय लोकशाही आणि सुशासन

प्रा. धर्मराज केशवराव कटके
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख,
लोकप्रशासन विभाग ,
कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी, ता.गेवराई, जि.बीड
katkedharmraj@gmail.com

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी व सामर्थशाली लोकशाही म्हणून ओळखली जाते. भारतीय लोकशाही सन 2022 मध्ये अमृत महोत्सवी वर्शात पदार्पण करीत आहे. भारतीय लोकशाही 1947 पासून उत्तरोत्तर प्रगल्भ व विकसीत होत असल्याचे दिसून येते. भारताने सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याचा स्वीकार केलेला आहे. भारतीय लोकशाही न्याय, स्वातंत्र्य, समता या तत्त्वावर आधारलेली आहे. गेल्या 72 वर्षात भारतीय लोकशाही अनेक अडथळे, समस्या, आव्हाने स्वीकारत समृध्द होत आहे. भारताने सांसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे.

भारतात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या तिन्ही संस्थांच्या कार्याच्या यशावरच भारतीय लोकशाहीचे भविश्य अवलंबून आहे. अलिकडील काळात 'न्यायलयीन सकीयता' वाढलेली दिसून येते. न्यायलयीन सक्रीयता वाढण्यामागे भारतीय लोकशाही समोर असणारी आव्हाने व 1991 चे आर्थिक धोरण हे जबाबदार असल्याचे दिसून येते.

भारतात लोकशाही समोर निरक्षरता, गरीबी, लिंगभेद, जातिवाद, धार्मिक भेद, असहिश्णूता, प्रदेशवाद, भाशावाद, भ्रष्टाचार, काळापैसा, बेरोजगारी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, पर्यावरण ऱ्हास, लोकसंख्या वाढ, सामाजिक आर्थिक असमानता ही आव्हाने आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिव कोफी अन्नान यांनी गरीबी दूर करण्याचे सुशासन हे एक महत्त्वाचे साधन आहे असे म्हटले होते. भारतीय लोकशाही समोर असणारी आव्हाने, समस्या या सुशासनाच्या माध्यमातून दूर करता येतात. लोकशाही समोरील आव्हाने, समस्या दूर करण्यासाठी भारतात सुशासनाच्या दिशेने अधिक वेगाने कार्य करणे गरजेचे आहे. सुशासनाची पुढील आठ वैशिष्ट्ये आहेत.

1. सहभागित्व
2. कायद्याचे राज्य
3. समाजभिमुख
4. समानता आणि सर्वसमावेशकता
5. कार्यक्षमता आणि प्रभावशीलता
6. जबाबदारीत्व
7. पारदर्शकता
8. प्रतिकियात्मकता

भारतीय लोकशाही समोरील समस्या दूर करण्याचे हेतूने सुशासनाच्या दृष्टीने पुढील पावले उचलल्याची दिसून येते.

भारतात 1992 मध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना 73 व्या घटनादुरुस्तीने घटनात्मक दर्जा देण्यात आला. या घटनादुरुस्ती अन्वये भाग 9 मध्ये कलम 243 ते 243–'ओ' चा समावेश करण्यात आला. 73 व्या घटनादुरुस्तीने तिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अंमलात आणली. गावात ग्रामपंचायत आणि ग्रामसभा, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिशदेचे स्थान निश्चित करण्यात आले. तसेच यामध्ये अनुसूचित जाती– अनुसूचित जमाती यांचे स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधत्व असावे या करिता लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद करण्यात आली. पंचायतराज संस्थांमध्ये 1/3 जागा, हया महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. 74 व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला. भाग 9–अ मध्ये 243 पी

ते 243 झेड जी या कलमांमध्ये विविध तरतूदी करण्यात आल्या. अशाप्रकारे 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने भारतात सामाजिक – आर्थिक लोकशाहीची निर्मिती करण्याचे कार्य केले. यामुळे स्थानिक स्तरावर सर्वसमावेशक स्वरुपाच्या लोकशाही विषयक तरतूदी दिसून येतात.

प्रशासनात पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे. शासनात पारदर्शकता आणण्यासाठी भारत सरकारने 15 जून 2005 रोजी माहितीचा अधिकार कायदा पास केला. माहितीच्या अधिकारामुळे सर्वसामान्य लोकांना कोणतीही शासकीय माहीती प्राप्त करता येते. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व वाढीस लागण्यास मदत होते.

लोकशाहीमध्ये लोकांना काम मिळणे अत्यंत आवश्यक असते. त्याशिवाय त्याला अर्थार्जन प्राप्त होवून तो उदरनिर्वाह व त्याच्या गरजा पूर्ण करु शकत नाही. भारत सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 अंमलात आणला. हे 'कामाचा अधिकार' या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल होय. जनतेला या कायद्याअंतर्गत वर्शभरात 100 दिवसाच्या कामाची हमी दिलेली आहे. या कायद्यामुळे गरीबी, दारिद्रय निर्मूलन होण्यास मदत होईल.

सुशासनाच्या मार्गातील निरक्षरता हा एक मोठा अडथळा आहे. देशाची लोकसंख्या हे त्या–त्या देशाचे भांडवल असते. शासनाकडून वारंवार जनतेची शिक्षणविषयक गरजा पूर्ण करण्याचे काम केले जाते. भारतात 86 व्या घटना दुरुस्ती कायद्यान्वये शिक्षणाचा मुलभूत अधिकार बालकांना सन 2002 मध्ये प्राप्त झाला आहे. 'मोफत व सक्तीचे शिक्षण' या तरतुदींचा समावेश असणारे जीविताचा अधिकार या अंतर्गत '21 अ' हे नविन कलम समाविष्ट करण्यात आले. राज्यघटनेतील शिक्षणाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी भारतीय संसदेने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 हा 1 एप्रिल 2010 पासून अंमलात आणला या कायद्याने 6 ते 14 वर्शे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाची तरतूद केलेली आहे. या कायद्यामुळे देशातील प्रत्येक बालकास शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला विद्यार्थी–शिक्षक प्रमाण 1:30 प्रमाणात झाले. खाजगी शाळेतील 25% जागा हया गरीब गटातील विद्यार्थ्यांस राखीव ठेवण्यात आल्या. शाळेच्या भौतीक आणि मानवी संसाधनात वाढझाली परिणामी बालकांना चांगले शिक्षण मिळण्यास मदत झाली. शिक्षणाचा अधिकार हे सुशासनाच्या दिशेने पडलेले महत्त्वपूर्ण पाऊल होय. ज्यामुळे भारतीय लोकशाही अधिक प्रबळ होईल.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्या 2013 अन्वये लोकांना अन्नाचा अधिकार प्राप्त झाला. या कायद्यामुळे लोकांची भूकबळी, उपासमारी, कुपोशणाच्या तावडीतून मुक्तता झाली. हे सुशासनाच्या मार्गातील महत्त्वाचे पाऊल आहे. कायद्यामुळे 82 कोटी लोकांना अन्न स्वस्तात मिळण्यास मदत होणार आहे. या कायद्याने प्रति व्यक्ति 5 किलो अन्न अनुदानावर देण्यात येणार आहे. तसेच गर्भवती महिलांना 6000 रु. भत्ता पोशण आहारासाठी देण्यात येणार आहे. संबंधित कायद्यमुळे गरीबी दूर होवून जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

भारतात प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना जानेवारी 2013 मध्ये सुरु करण्यात आली. 'आधार' कार्ड प्रणाली अस्तित्वात आणून प्रशासनात पारदर्शकता कार्यक्षमता, प्रभावशीलता आणण्याचे प्रयत्न होत आहेत. शासनाच्या सर्वच योजना या आधाराशी संलग्नीत करुन शासकीय योजनांमध्ये होणारे भ्रष्टाचार बाहेर काढले जात आहे. जनतेला कालबध्द वस्तू व सेवा प्रदान कायद्या अंमलात आणलेला आहे. यामुळे प्रशासनाच्या जबाबदारीच्या तत्त्वात वाढ होत आहे.

लोकशाहीचे जेवढी समृध्द होत जाते त्याप्रमाणात नागरिकांकडून अधिकाधिक मुलभुत अधिकारांची मागणी होत असते. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होण्यासाठी सुशासन असणे अत्यंत आवश्यक आहे. 'कायद्याचे राज्य' हे तत्त्व सुशासनात अंमलात आणले जाते. जनतेच्या विकासासाठी विविध प्रकारच्या योजना निर्माण करुन त्या अंमलात आणल्या जातात. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत जनतेचा सहभाग वाढवला जातो. स्वच्छता विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करत असतांना शासनाच्या जनतेच्या कार्यात हस्तक्षेप नव्हे तर योजनांच्या अंमलबजावणीत जनतेचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने लोकशाहीचे विकेंद्रीकरण होऊन प्रत्यक्ष स्थानिक स्तरावर देखील शासनाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण झाल्याचे दिसून येते. पंचायतराजच्या माध्यमातून सहभागित्व, समानता आणि सर्वसमाविशकता या बाबी प्रत्यक्षात कृतीत येण्यास मदत झाली. माहीती अधिकार कायदा, लोकसेवा हक्क कायदा यांसारख्या कायद्यांमुळे प्रशासनात कार्यक्षमता, प्रभावशीलता, पारदर्शकता, नैतिकता, जबाबदारित्व यात वाढ होत आहे. अन्नविषयक अधिकार, मनरेगा, सर्वांना घरे, सर्वांसाठी शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य यांसारख्या योजनांमधून जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजांची पूर्तता होण्यास मदत होत आहे. शाश्वत शेती विकास योजना, सेंद्रीय शेतीचे प्रकल्प यांच्या माध्यमातून अन्नविषयक गुणवत्ता सुधारणेचे

ते 243 झेड जी या कलमांमध्ये विविध तरतूदी करण्यात आल्या. अशाप्रकारे 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने भारतात सामाजिक – आर्थिक लोकशाहीची निर्मिती करण्याचे कार्य केले. यामुळे स्थानिक स्तरावर सर्वसमावेशक स्वरुपाच्या लोकशाही विषयक तरतूदी दिसून येतात.

प्रशासनात पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे. शासनात पारदर्शकता आणण्यासाठी भारत सरकारने 15 जून 2005 रोजी माहितीचा अधिकार कायदा पास केला. माहितीच्या अधिकारामुळे सर्वसामान्य लोकांना कोणतीही शासकीय माहीती प्राप्त करता येते. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व वाढीस लागण्यास मदत होते.

लोकशाहीमध्ये लोकांना काम मिळणे अत्यंत आवश्यक असते. त्याशिवाय त्याला अर्थार्जन प्राप्त होवून तो उदरनिर्वाह व त्याच्या गरजा पूर्ण करु शकत नाही. भारत सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 अंमलात आणला. हे 'कामाचा अधिकार' या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल होय. जनतेला या कायद्याअंतर्गत वर्शभरात 100 दिवसाच्या कामाची हमी दिलेली आहे. या कायद्यामुळे गरीबी, दारिद्रय निर्मूलन होण्यास मदत होईल.

सुशासनाच्या मार्गातील निरक्षरता हा एक मोठा अडथळा आहे. देशाची लोकसंख्या हे त्या–त्या देशाचे भांडवल असते. शासनाकडून वारंवार जनतेची शिक्षणविषयक गरजा पूर्ण करण्याचे काम केले जाते. भारतात 86 व्या घटना दुरुस्ती कायद्यान्वये शिक्षणाचा मुलभूत अधिकार बालकांना सन 2002 मध्ये प्राप्त झाला आहे. 'मोफत व सक्तीचे शिक्षण' या तरतुदींचा समावेश असणारे जीविताचा अधिकार या अंतर्गत '21 अ' हे नविन कलम समाविष्ट करण्यात आले. राज्यघटनेतील शिक्षणाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी भारतीय संसदेने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 हा 1 एप्रिल 2010 पासून अंमलात आणला या कायद्याने 6 ते 14 वर्शे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाची तरतूद केलेली आहे. या कायद्यामुळे देशातील प्रत्येक बालकास शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला विद्यार्थी–शिक्षक प्रमाण 1:30 प्रमाणात झाले. खाजगी शाळेतील 25% जागा हया गरीब गटातील विद्यार्थ्यांस राखीव ठेवण्यात आल्या. शाळेच्या भौतीक आणि मानवी संसाधनात वाढझाली परिणामी बालकांना चांगले शिक्षण मिळण्यास मदत झाली. शिक्षणाचा अधिकार हे सुशासनाच्या दिशेने पडलेले महत्त्वपूर्ण पाऊल होय. ज्यामुळे भारतीय लोकशाही अधिक प्रबळ होईल.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्या 2013 अन्वये लोकांना अन्नाचा अधिकार प्राप्त झाला. या कायद्यामुळे लोकांची भूकबळी, उपासमारी, कुपोशणाच्या तावडीतून मुक्तता झाली. हे सुशासनाच्या मार्गातील महत्त्वाचे पाऊल आहे. कायद्यामुळे 82 कोटी लोकांना अन्न स्वरतात मिळण्यास मदत होणार आहे. या कायद्याने प्रति व्यक्ति 5 किलो अन्न अनुदानावर देण्यात येणार आहे. तसेच गर्भवती महिलांना 6000 रु. भत्ता पोशण आहारासाठी देण्यात येणार आहे. संबंधित कायद्यामुळे गरीबी दूर होवून जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

भारतात प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना जानेवारी 2013 मध्ये सुरु करण्यात आली. 'आधार' कार्ड प्रणाली अस्तित्वात आणून प्रशासनात पारदर्शकता कार्यक्षमता, प्रभावशीलता आणण्याचे प्रयत्न होत आहेत. शासनाच्या सर्वच योजना या आधाराशी संलग्नीत करुन शासकीय योजनांमध्ये होणारे भ्रष्टाचार बाहेर काढले जात आहे. जनतेला कालबध्द वस्तू व सेवा प्रदान कायद्या अंमलात आणलेला आहे. यामुळे प्रशासनाच्या जबाबदारीच्या तत्त्वात वाढ होत आहे.

लोकशाहीचे जेवढी समृध्द होत जाते त्याप्रमाणात नागरिकांकडून अधिकाधिक मुलभुत अधिकारांची मागणी होत असते. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होण्यासाठी सुशासन असणे अत्यंत आवश्यक आहे. 'कायद्याचे राज्य' हे तत्त्व सुशासनात अंमलात आणले जाते. जनतेच्या विकासासाठी विविध प्रकारच्या योजना निर्माण करुन त्या अंमलात आणल्या जातात. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत जनतेचा सहभाग वाढवला जातो. स्वच्छता विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करत असतांना शासनाच्या जनतेच्या कार्यात हस्तक्षेप नव्हे तर योजनांच्या अंमलबजावणीत जनतेचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने लोकशाहीचे विकेंद्रीकरण होऊन प्रत्यक्ष स्थानिक स्तरावर देखील शासनाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण झाल्याचे दिसून येते. पंचायतराजच्या माध्यमातून सहभागित्व, समानता आणि सर्वसमाविशकता या बाबी प्रत्यक्षात कृतीत येण्यास मदत झाली. माहीती अधिकार कायदा, लोकसेवा हक्क कायदा यांसारख्या कायद्यांमुळे प्रशासनात कार्यक्षमता, प्रभावशीलता, पारदर्शकता, नैतिकता, जबाबदारित्व यात वाढ होत आहे. अन्नविषयक अधिकार, मनरेगा, सर्वांना घरे, सर्वांसाठी शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य यांसारख्या योजनांमधून जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजांची पूर्तता होण्यास मदत होत आहे. शाश्वत शेती विकास योजना, सेंद्रीय शेतीचे प्रकल्प यांच्या माध्यमातून अन्नविषयक गुणवत्ता सुधारणेचे

प्रयत्न सुशासनाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. लोकशाहीमध्ये लोकांना राज्यघटनेने दिलेले अधिकार मिळाले पाहीजेत. त्यांना शांततापूर्ण जीवन जगता आले पाहीजे. विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे हे सुशासनाचे प्राथमिक वैशिष्ट्ये आहे. आज डिजिटल युगात विविध शासकीय योजना आधारशी संलग्न करुन त्यामध्ये होणारा भ्रष्टाचार, लालफितशाही, दफ्तर दिरंगाई या समस्या मुक्त सुशासनाची निर्मिती होणे गरजेचे आहे. सुशासनात सहभागित्व, कायद्याचे राज्य, समाजभिमुखता, समानता आणि सर्वसमाशेकता, कार्यक्षमता, प्रभावशीलता, जबाबदारित्व, पारदर्शकता आणि प्रतिकियात्मकता या तत्वांचे जेवढ्या अधिक प्रमाणात पालन होईल, अंमलात येईल तेवढ्या प्रमाणात भारतीय लोकशाही समृध्द सामर्थ्यशाली आणि परिपक्व होईल. सुशासन हे भारतीय लोकशाही समोरील आव्हाने दूर करण्यास पर्याय ठरणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात केंद्र व राज्य अशा दोन्ही स्तरावर प्रयत्न होतांना दिसून येतात. त्याचबरोबर नागरिकांच्या कर्तव्ये पालनात देखील वाढ होणे गरजेचे आहे. सुशासनाच्या यशस्वी अंमलबजावणीरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून आहे त्यासाठी स्थानिक स्तरापासून केंद्रीय स्तरावर सुशासनाची निर्मिती व अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## References :-


- Sanjeev kumar Sharma, Good Governance In Ancieut India.
- Ranbir Singh, Enforcing the Risut to Education Act in Rural areas, The tribune, December 19, 2010.
- Planning Commission, Government of India Elereuth Five year plan (2007-12) Voi. – I, P.224 N.K. Jain Right to information, Law and Practice, Deep and Deep Publication New Delhi-2007.
- Surendra Munshi, Good Governance, Democratic Scieties and Globlization, Sage Publication, New Delhi.

प्रयत्न सुशासनाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. लोकशाहीमध्ये लोकांना राज्यघटनेने दिलेले अधिकार मिळाले पाहीजेत. त्यांना शांततापूर्ण जीवन जगता आले पाहीजे. विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे हे सुशासनाचे प्राथमिक वैशिष्ट्ये आहे. आज डिजिटल युगात विविध शासकीय योजना आधारशी संलग्न करुन त्यामध्ये होणारा भ्रष्टाचार, लालफितशाही, दफ्तर दिरंगाई या समस्या मुक्त सुशासनाची निर्मिती होणे गरजेचे आहे. सुशासनाचे सहभागित्व, कायद्याचे राज्य, समाजभिमुखता, समानता आणि सर्वसमाशेकता, कार्यक्षमता, प्रभावशीलता, जबाबदारित्व, पारदर्शकता आणि प्रतिक्रियात्मकता या तत्वांचे जेवढ्या अधिक प्रमाणात पालन होईल, अंमलात येईल तेवढ्या प्रमाणात भारतीय लोकशाही समृध्द सामर्थ्यशाली आणि परिपक्व होईल. सुशासन हे भारतीय लोकशाही समोरील आव्हाने दूर करण्यास पर्याय ठरणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात केंद्र व राज्य अशा दोन्ही स्तरावर प्रयत्न होतांना दिसून येतात. त्याचबरोबर नागरिकांच्या कर्तव्ये पालनात देखील वाढ होणे गरजेचे आहे. सुशासनाच्या यशस्वी अंमलबजावणीरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून आहे त्यासाठी स्थानिक स्तरापासून केंद्रीय स्तरावर सुशासनाची निर्मिती व अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## References :-

- Sanjeev kumar Sharma, Good Governance In Ancieut India.
- Ranbir Singh, Enforcing the Risut to Education Act in Rural areas, The tribune, December 19, 2010.
- Planning Commission, Government of India Elereuth Five year plan (2007-12) Voi. – I, P.224 N.K. Jain Right to information, Law and Practice, Deep and Deep Publication New Delhi-2007.
- Surendra Munshi, Good Governance, Democratic Scieties and Globlization, Sage Publication, New Delhi.